RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ७७

दि.१४ जुलै २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990



लातूर महानगरपालिकेचे नूतन आयुक्त तथा आयएएस अधिकारी राहुल कुलकर्णी यांची सदिच्छा भेट घेत प्रा. विश्वनाथ आल्टे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले व पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## सुसाट स्कॉर्पिओ थेट धावत्या डंपरमध्ये मागून घुसली, पाच जणांचा मृत्यू

बारमेरः एका भीषण रस्ते अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आणि तीन जण गंभीर जखमी झाले. भरधाव वेगाने जाणाऱ्या स्कॉर्पिओ गाडीची एका धावत्या डंपर ट्रकशी धडक झाली. ही धडक इतकी जोरदार होती की स्कॉर्पिओचा समोरून चक्काचूर झाला. जखमी व्यक्ती गाडीच्या आत वेदनेने विव्हळत होत्या. त्यांच्या किंकाळ्या ऐकून आजूबाजूच्या परिसरातील लोकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना वाचवले.हा अपघात बारमेर-जोधपूर राष्ट्रीय महामार्गावर, पाचपद्रा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भाडियावास गावाजवळ रात्री सुमारे ११:३० वाजता घडला. मृतकांची ओळख रेवंत राम (२६), गेनाराम जाट यांचा मुलगा, स्वरूपराम (२७), मेहरा राम जाट यांचा मुलगा, भरत (२५), बन्ना राम जाट यांचा मुलगा, किशन (२७), शेराराम जाट यांचा मुलगा आणि भावेश, कला राम जाट यांचा मुलगा, अशी पटली आहे. हे सर्व बालोत्रा जिल्ह्यातील कानोड गावचे रहिवासी होते. ते जोधपूरमधील भोमियाजी येथील तीर्थयात्रेवरून परत येत होते. रेवंतराम, स्वरूपराम आणि भरत यांचा जागीच मृत्यू झाला. गंभीर जखमी झालेल्या किशन, भावेश, बाबू, मुकेश आणि हेमाराम यांना प्रथमोपचारानंतर जोधपूरला दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान किशन आणि भावेश यांचा मृत्यू झाला.

## 'चौरंग : स्वर स्नेहल'मधून संगीतकार स्नेहल भाटकर यांच्या सुरेल जीवनप्रवासाला अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी :** सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने ज्येष्ठ संगीतकार स्नेहल भाटकर यांच्या जयंतीनिमित्त 'चौरंग : स्वर स्नेहल' या विशेष संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार, १७ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे करण्यात आले आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक अशोक हांडे यांची संकल्पना, लेखन आणि दिग्दर्शन लाभलेल्या या कार्यक्रमातून संगीतकार स्नेहल भाटकर यांच्या समृद्ध संगीतप्रवासाचा सुरेल मागोवा घेण्यात येणार आहे.

स्नेहल भाटकर यांनी मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला आपल्या मधुर, भावस्पर्शी आणि दर्जेदार संगीताने समृद्ध केले. त्यांच्या संगीत रचनांमध्ये भारतीय शास्त्रीय संगीताची परंपरा, भावनांची सूक्ष्म अभिव्यक्ती आणि सुरेलतेचा उत्कृष्ट मिलाफ आढळतो. त्यांनी संगीतबद्ध केलेली अनेक गीते आजही रसिकांच्या मनात तितक्याच प्रेमाने गुणगुणली जातात आणि भारतीय संगीतविश्वातील अमूल्य ठेवा म्हणून ओळखली जातात.

'चौरंग : स्वर स्नेहल' या कार्यक्रमातून स्नेहल भाटकर यांच्या जीवनातील विविध टप्पे, संगीत क्षेत्रातील योगदान, त्यांच्या कारकिर्दीतील संस्मरणीय आठवणी आणि अजरामर गीतांचा सुरेल प्रवास रंगमंचावर उलगडण्यात येणार आहे. संगीत, निवेदन, नाट्यरूपांतर आणि दृश्य मांडणी यांच्या प्रभावी संगमातून रसिकांना त्यांच्या संगीतमय जीवनगाथेचा अविस्मरणीय अनुभव मिळणार आहे.ज्येष्ठ रंगकर्मी अशोक हांडे यांची संकल्पना, लेखन आणि दिग्दर्शनातून साकारलेला हा कार्यक्रम स्नेहल भाटकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, संगीतदृष्टीचा आणि सांगीतिक वारशाचा सर्वांगीण परिचय करून देणारा ठरणार आहे. त्यांच्या सुरेल रचनांमधून भारतीय संगीत संस्कृतीची समृद्ध परंपरा आणि भावविश्वाचा अनोखा आविष्कार या कार्यक्रमातून अनुभवता येणार आहे.

हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार, यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे.

# 'लाडकी बहीण'मधून ९२ लाख महिला का वगळल्या गेल्या?

## कॅगचे ताशेरे आणि बीडमधील गोंधळावर मंत्री अदिती तटकरेंचा मोठा खुलासा

**मुंबई/प्रतिनिधी :**'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील ३,५४२ कोटी रुपयांच्या खर्चावर 'कॅग'ने ताशेरे ओढल्यानंतर आणि योजनेतून तब्बल ९२ लाख महिलांना वगळण्यात आल्याच्या चर्चेने राज्यात मोठी खळबळ उडाली होती. विशेषतः बीड जिल्ह्यातील अपात्र महिलांच्या आकडेवारीवरून राजकीय वर्तुळात संभ्रम निर्माण झाला होता. या सर्व घडामोडींवर आता राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी सविस्तर स्पष्टीकरण दिले असून, पात्र आणि अपात्र महिलांची नेमकी आकडेवारी समोर ठेवली आहे.








अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले की, ऑगस्ट २०२५ पासून या योजनेसाठी ई-केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. यासाठी महिलांना तब्बल ६ महिन्यांची मुदत देण्यात आली होती, तर त्रुटी दूर करण्यासाठी एप्रिलपर्यंतचा वेळ देण्यात आला होता. वारंवार संधी देऊनही अनेक महिलांनी या प्रक्रियेची पूर्तता न केल्याने त्यांना योजनेतून बाद करण्यात आले आहे.

**अपात्र ठरलेल्या महिलांची प्रमुख कारणे व आकडेवारी:**

ई-केवायसी आणि अंतिम छाननी प्रक्रियेनंतर खालील कारणांमुळे लाभार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे:

**ई-केवायसी न केलेल्या महिला (६० लाख) :** योजनेची ई-केवायसी प्रक्रिया ऑगस्ट २०२५ पासून सुरू करण्यात आली होती. यासाठी ६ महिन्यांचा मोठा कालावधी देण्यात आला होता आणि त्रुटी दुरुस्त करण्यासाठी एप्रिल २०२६ पर्यंत मदत केली गेली. मात्र, वारंवार संधी देऊनही ६० लाख महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली नाही.

**आयकर दाते (५ लाख) :** आयकर विभागाच्या डेटा पडताळणीमध्ये ५ लाख महिलांचे कुटुंब करदाते असल्याचे स्पष्ट झाल्याने त्या अपात्र ठरल्या.

**उत्पन्न मर्यादा (१४ ते १५ लाख) :** ज्या महिलांच्या पतीचे किंवा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त आहे, अशा १४ ते १५ लाख महिलांचा डेटा समोर आल्याने त्यांना वगळण्यात आले.

**चारचाकी वाहन मालक (४.५ ते ५ लाख) :** कुटुंबाच्या नावावर चारचाकी वाहन असल्याच्या निकषात न बसल्यामुळे साडेचार ते पाच लाख महिला अपात्र ठरल्या आहेत.

ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे, मात्र तरीही त्यांना लाभ मिळालेला नाही, अशा तक्रारींची सध्या प्रशासनाकडून युद्धपातळीवर पडताळणी सुरू असल्याचेही अदिती तटकरे यांनी सांगितले.

## बीड जिल्ह्यात खरंच २८ लाख महिला अपात्र?

बीड जिल्ह्यातून तब्बल २८ लाख महिला अपात्र ठरल्याची जोरदार चर्चा सोशल मीडिया आणि राजकीय वर्तुळात सुरू होती. बीड जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या संख्येवरून पसरलेल्या अफवांचा समाचार घेताना मंत्री तटकरे यांनी सांगितले की, बीड जिल्ह्याबाबत चाललेली चर्चा पूर्णपणे तथ्यहीन आहे.

बीड जिल्ह्याची एकूण लोकसंख्याच ३२ लाख आहे. जर एकूण लोकसंख्या ३२ लाख असेल, तर तिथे २८ लाख लाभार्थी अपात्र कसे काय असू शकतात? या डेटामध्ये काहीही तथ्य नाही. बीड जिल्ह्यातून एकूण ६.५ लाख महिलांची नोंदणी झाली होती. त्यापैकी सध्या ४ ते ४.५ लाख महिला पात्र ठरल्या असून त्यांना नियमितपणे लाभ दिला जात आहे, असे अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले.

**राज्यात सध्या किती 'लाडक्या बहिणी' पात्र आहेत?**

योजनेच्या मूळ आकडेवारीबाबतचा संभ्रम दूर करताना आदिती तटकरे यांनी सांगितले की, सुरुवातीला २ कोटी ६३ लाख महिलांनी नोंदणी केली होती. छाननीनंतर सुरुवातीला २ कोटी ४३ लाख ते २ कोटी ४७ लाख महिला पात्र ठरल्या होत्या. या जुन्या आकडेवारीशी तुलना केल्यामुळेच ९२ लाख महिला कमी झाल्याचा आकडा समोर येत आहे.

मात्र, ई-केवायसी प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे पूर्ण केल्यानंतर सध्या राज्यात १ कोटी ६७ लाख ते १ कोटी ७० लाख महिला अंतिमरित्या पात्र ठरल्या आहेत. शासनाने जो शेवटचा हप्ता वितरित केला, त्याअंतर्गत थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) १ कोटी ६७ लाख महिलांच्या बँक खात्यात सन्मान निधी जमा करण्यात आल्याची पुष्टीही त्यांनी केली.

## राज्य व राष्ट्रीय स्तरावरील नैपुण्य प्राप्त तायक्कांदो खेळाडूंचा सन्मान

### शैलेशजी लाहोटी यांच्या जन्मदिनानिमित्त अत्रिवरद प्रतिष्ठानचा उपक्रम



**लातूर/प्रतिनिधी :** श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शैलेशजी लाहोटी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून, 'अत्रिवरद प्रतिष्ठान' या सामाजिक संस्थेच्या वतीने तायक्कांदो या ऑलिम्पिक क्रीडा प्रकारात राज्य व राष्ट्रीय स्तरावर नैपुण्य मिळवलेल्या खेळाडूंचा विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात 'रिलिजन टू रिस्पॉन्सिबिलिटी' या सामाजिक संघटनेचे अध्यक्ष राहुल पाटील चाकूरकर आणि कॅप्टन बी. के. भालेराव यांच्या हस्ते दि १२ जुलै रोजी वंदे मातरम् सभागृह श्री केशवराज विद्यालय श्याम नगर लातूर येथे खेळाडूंना सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला अत्रिवरद प्रतिष्ठान चे संस्थापक प्रवीण शिवणगिकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आशियाई तायक्कांदो प्रशिक्षक तथा राष्ट्रीय पंच मास्टर नेताजी जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अत्रिवरद प्रतिष्ठान मागील अनेक वर्षांपासून हा स्तुत्य उपक्रम राबवत आहे. या प्रकारच्या सन्मानामुळे खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळते. लातूरकरांना लाहोटी परिवाराचे मोठे सामाजिक योगदान लाभले असून, शैलेशजी लाहोटी हे स्वतः सामाजिक उपक्रमांमध्ये नेहमीच सक्रिय असतात. अत्रिवरद प्रतिष्ठान अशा प्रकारे कृतज्ञता व्यक्त करत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

या कार्यक्रमास व्यासपीठावर संतोष बेंबळकर व महेश वळसंगे, हे उपस्थित होते. आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार प्राप्त सुनील मुनाळे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विवेक डोंगरे, आशिद बनसोडे, अमृत पावले, अनिल कांबळे, ज्ञानेश्वर यादव, मंगेश रंकाळे, ज्ञानेश्वर गोसावी, तुषार येवनगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेच्या पाठपुराव्याला यश; बुरहाननगरमध्ये धोकादायक विद्युत तारा हटवून केबल टाकण्याचे काम पूर्ण





**लातूर/प्रतिनिधी :** बुरहाननगर परिसरातील विद्युत पोलवरील तारा जीर्ण व धोकादायक झाल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला होता. या गंभीर समस्येची दखल घेत व्ही. एस. पँथर्स युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या सूचनेनुसार वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार यांनी महावितरणकडे निवेदन देऊन तातडीने केबल टाकण्याची मागणी केली होती.

संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर महावितरणने या मागणीची दखल घेत बुरहाननगर परिसरातील धोकादायक विद्युत तारा हटवून सुरक्षित केबल टाकण्याचे काम पूर्ण केले. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून संभाव्य दुर्घटनांचा धोका टळला आहे. यावेळी वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार यांनी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नागरिकांच्या वतीने आभार मानले. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व मूलभूत सुविधांसाठी व्ही. एस. पँथर्स युवा संघटना यापुढेही सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनो... सोळाव वरिष धोक्याचे नसून आयुष्य घडविण्याचे आहे : दिलीप आमले (व्यसनमुक्त समाज प्रबोधनकार)

**नवी मुंबई / के. एच. हनवते :** नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, नवी मुंबई वाहतूक विभाग (सीबीडी), त्रिमूर्ती व्यसनमुक्ती जनजागृती अभियान आणि अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल, नेरूळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ११७, दिवाळे गाव, बेलापूर येथे रस्ता सुरक्षा, व्यसनमुक्ती व मुलींचे संरक्षण या विषयावर विशेष जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

सदर कार्यक्रमात अधिकारी श्री संजय नकाते मोटार वाहन निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री नाथ लोखंडे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री तुषार कदम, समाजप्रबोधनकार श्री दिलीप किसनराव आमले (प्रमुख व्यसनमुक्ती जनजागृती), श्री महेन्द्र पाटील केंद्र प्रमुख, श्री गणेश केदारे वाहतूक पोलीस, श्री चंद्रकांत कोळी मा वार्ड अधिकारी महानगरपालीका तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. शोभा कुदळे (मुख्याध्यापिका) उपस्थित सर्व शिक्षक शिक्षिका कर्मचारी व विद्यार्थी यावेळी. श्री संजय नकाते यांनी आरटीओचे नियम व नागरिकांची जबाबदारी, श्री नाथ लोखंडे यांनी वाहतुकीचे नियम व रस्ता सुरक्षा, श्री तुषार कदम यांनी लर्निंग लायसन्स प्रक्रिया व परिवहन विभागाच्या सेवांची माहिती दिली.

समाजप्रबोधनकार श्री दिलीप किसनराव आमले यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश देत सोळावे वर्ष बिघडविण्याचे नसून आयुष्य घडविण्याचे असते...! व्यसनापासून दूर राहा, शिक्षणाला प्राधान्य द्या आणि पालक-शिक्षकांचा सन्मान करा. असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांकडून व्यसनमुक्त राहण्याची, वाहतुकीचे नियम पाळण्याची व जबाबदार नागरिक बनण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री दिलीप किसनराव आमले यांनी केले. वाहतूक विषयावरील प्रश्नमंजुषेत योग्य उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षा, व्यसनमुक्ती आणि सामाजिक



जबाबदारीबाबत जनजागृती झाली आहे.

संपादकीय...

## उपवर्गीकरणाच्या वादात समाजाला भिडविण्याचे प्रयत्न धोकादायक

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा प्रश्न सध्या महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे. या विषयावर विविध समाजघटकांमध्ये समर्थन आणि विरोधाच्या भूमिका दिसून येत आहेत. मतभिन्नता असणे ही लोकशाहीची ताकद असली तरी त्याचे रूपांतर जातीय संघर्षात होऊ लागले तर तो चिंतेचा विषय ठरतो. उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ आणि विरोधात अनेक संघटना, नेते आणि कार्यकर्ते आपापल्या भूमिका मांडत आहेत. मोर्चे, सभा, आंदोलने आणि निवेदने यांद्वारे आपले मत मांडणे हा प्रत्येकाचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र या प्रक्रियेत सामाजिक सलोखा धोक्यात येणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. गेल्या काही दिवसांत सोशल मीडियावर आणि सार्वजनिक चर्चांमध्ये काही भडकाऊ वक्तव्ये समोर येत आहेत. यामुळे समाजात संभ्रमाचे वातावरण निर्माण होत आहे. काही व्यक्ती किंवा गट जाणीवपूर्वक मतभेदांना अधिक तीव्र स्वरूप देण्याचा प्रयत्न करीत असल्याची भावना अनेक नागरिक व्यक्त करीत आहेत. विशेषतः महार आणि मांग या दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा समाजात सुरू आहे. या चर्चांमुळे सामान्य नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. मात्र अशा संवेदनशील विषयांवर कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापूर्वी वस्तुस्थिती तपासणे गरजेचे आहे. महार आणि मांग समाजाचा इतिहास संघर्षाचा असला तरी तो परस्पर संघर्षाचा नाही. सामाजिक न्याय, शिक्षण, समानता आणि मानवी हक्कांसाठी या समाजांनी अनेकदा खांद्याला खांदा लावून लढा दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला बंधुतेचा संदेश हा या संघर्षाचा पाया राहिला आहे. त्यामुळे एका प्रश्नावर मतभेद झाले म्हणून समाजांमध्ये कायमस्वरूपी दरी निर्माण होईल असे मानणे चुकीचे ठरेल. आज सर्वात मोठा धोका हा अफवा, दिशाभूल आणि भडकाऊ प्रचाराचा आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून काही मिनिटांत हजारो लोकांपर्यंत चुकीची माहिती पोहोचते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने माहितीची सत्यता तपासण्याची सवय लावली पाहिजे. कोणत्याही समाजातील काही व्यक्तींच्या वक्तव्यांवरून संपूर्ण समाजाला जबाबदार धरणे योग्य नाही. त्यामुळे केवळ तणाव वाढतो आणि संवादाचे मार्ग बंद होतात. उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ असलेल्यांची काही मते आहेत. विरोध करणाऱ्यांचीही काही कारणे आहेत. दोन्ही बाजूंनी घटनात्मक आणि लोकशाही मार्गाने आपले म्हणणे मांडणे हा योग्य मार्ग आहे. समाजातील तरुण पिढीने विशेष जबाबदारीने वागण्याची गरज आहे. सोशल मीडियावर आलेल्या प्रत्येक पोस्टला सत्य मानणे धोकादायक ठरू शकते. विचारपूर्वक प्रतिक्रिया देणे ही काळाची गरज आहे. आज अनेक राजकीय शक्ती आणि सामाजिक संघटना या विषयात सक्रिय झाल्या आहेत. अशा वेळी समाजातील ज्येष्ठ, बुद्धिजीवी आणि जबाबदार नेत्यांनी शांततेचा संदेश देणे आवश्यक आहे. महापुरुषांच्या नावाचा वापर करून द्वेषाचे राजकारण करणे हा त्यांच्या विचारांचा अपमान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांचा पुरस्कार केला होता. त्यांच्या विचारांचा आधार घेऊन समाजात वैर निर्माण करणे चुकीचे आहे. उपवर्गीकरणाचा प्रश्न हा कायदेशीर, घटनात्मक आणि सामाजिक स्वरूपाचा आहे. त्यामुळे त्याचे उत्तरही घटनात्मक चौकटीतच शोधले पाहिजे. शासन, न्यायालये आणि संबंधित यंत्रणा या विषयावर निर्णय घेतील. तोपर्यंत समाजाने संयम राखणे आवश्यक आहे. भावनांच्या भरात घेतलेले निर्णय भविष्यात नुकसानकारक ठरू शकतात. महार असो वा मांग, दोन्ही समाजातील सामान्य माणसाच्या समस्या सारख्याच आहेत. शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवारा आणि सामाजिक प्रतिष्ठा हे प्रश्न आजही महत्त्वाचे आहेत. समाजातील वास्तविक प्रश्नांपासून लक्ष विचलित करून परस्परांमध्ये संघर्ष निर्माण झाला तर त्याचा फायदा इतरांना होईल; मात्र नुकसान समाजाचेच होईल. म्हणूनच आज आवश्यकता आहे ती संवादाची, समन्वयाची आणि परस्पर आदराची. मतभेद असू द्या, पण मनभेद होऊ देऊ नका. विचारांवर चर्चा होऊ द्या, पण समाजांमध्ये भिंती उभ्या राहू देऊ नका. महार आणि मांग हे दोन्ही समाज सामाजिक न्यायाच्या व्यापक चळवळीचे घटक आहेत. त्यांची एकजूट हीच त्यांची सर्वात मोठी ताकद आहे. उपवर्गीकरणाच्या वादात कोणाची भूमिका योग्य किंवा अयोग्य यावर चर्चा होऊ शकते; मात्र समाजात द्वेष आणि तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घेणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. आजचा काळ संघर्षाचा नाही तर समजुतीचा आहे. बंधुता टिकवून ठेवली तर कोणताही प्रश्न सोडविता येतो. समाजाची ताकद एकतेत आहे आणि ती जपणे हेच सर्वांचे पहिले कर्तव्य आहे.

# परिवर्तनवादी साहित्याचे नवे पर्व सुरू; राज्यस्तरीय संमेलनाच्या नियोजनाला विचारांचे अधिष्ठान

## साहित्यिक, विचारवंत, प्राध्यापक, समाजसेवक व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** समाजपरिवर्तनाच्या वैचारिक प्रवाहाला नवी ऊर्जा देण्याच्या उद्देशाने आगामी ऑक्टोबर महिन्यात आयोजित करण्यात येणाऱ्या पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलनाच्या नियोजनाची पहिली बैठक ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. परिवर्तनवादी साहित्याची व्यापक दिशा, समकालीन समाजातील त्याची आवश्यकता आणि संमेलनाचे स्वरूप यावर या बैठकीत सखोल व विधायक चर्चा झाली.

साहित्य हे केवळ अभिव्यक्तीचे माध्यम नसून सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. फुले-शाहू-आंबेडकरांच्या समतावादी विचारपरंपरेला साहित्याच्या माध्यमातून अधिक व्यापक करण्याची आज नितांत गरज आहे, अशी भावना





उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. परिवर्तनवादी लेखक, कवी, अभ्यासक, संशोधक, पत्रकार आणि सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते यांना एकाच वैचारिक विचारपीठावर आणण्याच्या दृष्टीने हे संमेलन महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्र्वासही व्यक्त करण्यात आला.

बैठकीत संमेलन अधिक व्यापक, अभ्यासपूर्ण आणि परिणामकारक कसे होईल, यावर विविध मान्यवरांनी मोलाच्या सूचना मांडल्या. संमेलनाची तारीख, स्थळ, संमेलनाध्यक्ष, प्रमुख पाहुणे तसेच विविध समित्यांची घोषणा पुढील नियोजन बैठकीत करण्यात येईल, असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे, प्रा. डॉ. शिवाजी वाठोरे, डॉ. धनराज गोंडाणे, के. ई. हरदास, प्रा. डॉ. प्रज्ञा साळवे, प्रा. भारत सिरसाट, ॲड. डी. व्ही. खिल्लारे, राहुल साळवे, ॲड. रवी तायडे, मुकुंद सुरडकर, विनोद मोरे, डॉ. मधुकर दिवेकर, जीवन कुळकर्णी, अनंत भवरे आणि बाबुराव बनसोडे यांनी आपले विचार व्यक्त केले.

संमेलनाच्या तयारीला बळ देत ॲड. डी. व्ही. खिल्लारे यांनी संमेलनासाठी ५,००० रुपये निधी देण्याची घोषणा केली. त्यांच्या या योगदानाचे उपस्थितांनी स्वागत केले.

बैठकीस राहुल साळवे, अनिल वानखेडे, उत्तमराव मस्के, अनंत भवरे, विद्या साळवे, रामदास मगरे, भीमराव गाडेकर , डॉ. मधुकर दिवेकर, विनोद मोरे, के. ई. हरदास, डॉ. प्रज्ञा साळवे, सनीभाई लाहोर, ॲड. रवी तायडे, मुकुंद सुरडकर, जितेंद्र भवरे, डॉ. विजय कांबळे, प्रा. भारत सिरसाट, दशरथ भातपुडे, रमेश वानखेडे, विलास गोरे यांच्यासह अनेक साहित्यप्रेमी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संमेलन मुख्यसंयोजक रतनकुमार साळवे यांनी केले. सूत्रसंचालन भीमराव गाडेकर यांनी केले, तर विनोद मोरे यांनी आभार मानले.

बैठकीचा समारोप आशावादी वातावरणात झाला. परिवर्तनवादी साहित्याला राज्यव्यापी स्वरूप देण्याच्या दिशेने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारत एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार केला. संमेलनासंदर्भातील सर्व महत्त्वपूर्ण आणि अंतिम निर्णय पुढील नियोजन बैठकीत जाहीर करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

# स्वच्छते संदर्भातील ११ प्रमुख मागण्यांवर नगरपरिषदेकडून लेखी आश्वासन; प्रस्तावित मोर्चा स्थगित

**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी व शिस्तबद्ध करण्यासाठी नगरसेविका सौ. तनुजाताई सिद्धार्थकुमार सूर्यवंशी व सम्राट मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी नगरपरिषद प्रशासनाला ११ प्रमुख मागण्यांचे सविस्तर निवेदन देत मागण्या तातडीने मान्य न झाल्यास नगरपरिषद कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. या इशाऱ्याची गंभीर दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने सर्व मागण्यांवर लेखी उत्तर देत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

निवेदनामध्ये शहरात युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम राबविणे, घनकचरा व्यवस्थापनाची निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रभावी अंमलबजावणी करणे, सर्व प्रभागांतील नाल्यांची साफसफाई पूर्ण करणे, नादुरुस्त घंटागाड्या तातडीने सुरू करणे, घनकचरा व्यवस्थापन नियम-२०१६ ची प्रभावी अंमलबजावणी करणे, स्वच्छता कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे,कर्मचाऱ्यांचा ईपीएफ भरणे, कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून देणे,कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी सक्तीची करणे, बसस्थानकासमोरील सार्वजनिक शौचालयाची सेवा तातडीने सुरू करणे तसेच शहरातील बंद पथदिवे दुरुस्त करून आवश्यकतेनुसार नवीन विद्युत साहित्य खरेदी करण्याची मागणी करण्यात आली होती.

नगरपरिषद प्रशासनाने दिलेल्या लेखी उत्तरात शहरातील प्रमुख रस्ते, सार्वजनिक ठिकाणे व बाजारपेठांमध्ये नियमित स्वच्छता सुरू असून आवश्यक ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येईल, घनकचरा व्यवस्थापनाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून कार्यादेश देऊन प्रभावी अंमलबजावणी केली जाईल, नाल्यांची साफसफाई तातडीने पूर्ण करण्यात येईल, नादुरुस्त घंटागाड्या दुरुस्त करण्यात येतील, घनकचरा व्यवस्थापन नियमांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल, नवीन कार्यादेशानंतर आवश्यक मनुष्यबळाची भरती केली जाईल, स्वच्छता कर्मचाऱ्यांना सुरक्षा साहित्य पुरविण्यात येईल, बायोमेट्रिक हजेरी सुरू करण्यात येईल, सार्वजनिक शौचालयासंदर्भातील निविदा प्रक्रिया शासनाच्या नियमांनुसार पूर्ण करण्यात येईल व अनियमितता आढळल्यास चौकशी करण्यात येईल, तसेच शहरातील बंद पथदिव्यांची दुरुस्ती व नवीन साहित्य खरेदी करून प्रकाश व्यवस्था सुधारण्यात येईल, असे नगरपरिषदेने लेखी स्वरूपात स्पष्ट केले आहे.

नगरपरिषद प्रशासनाने पत्रामध्ये नमूद केले आहे की, निवेदनातील सर्व मागण्यांवर सकारात्मक दृष्टीकोनातून कार्यवाही सुरू असून प्रशासनाला आवश्यक कालावधी देण्यात यावा. त्यानुसार प्रस्तावित मोर्चा मागे घेण्याची विनंतीही प्रशासनाने केली आहे. याबाबत डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी सांगितले की, नगरपरिषद प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यामुळे आम्ही त्यांचे स्वागत करतो.

मात्र हे आश्वासन केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष अंमलात आले पाहिजे. दिलेल्या कालावधीत कामे पूर्ण न झाल्यास नागरिकांच्या हितासाठी पुढील लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल. नगरसेविका सौ. तनुजाताई सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनीही सांगितले की, स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी अहमदपूर हेच आमचे ध्येय आहे. प्रशासनाने दिलेल्या प्रत्येक आश्वासनाच्या अंमलबजावणीवर आम्ही सातत्याने लक्ष ठेवणार आहोत.

# अस्वस्थ वर्तमानाचा बर्म्युला ट्रँगल : यातनांचे प्रतिबिंब

संजय घाडगे यांचा 'अस्वस्थ वर्तमानाचा बर्म्युला ट्रँगल' कवितासंग्रह नावातच गूढ वलय निर्माण करतो. 'बर्म्युला ट्रँगल' हा समुद्र प्रदेश जहाजांना गिळंकृत करतो, जशी आपली समाज व्यवस्था गोरगरिबांचे आयुष्य! हाच केंद्रबिंदू या संग्रहातील कवितांचा विषय आहे. संजय घाडगे यांचे आतापर्यंत ५ कवितासंग्रह प्रसिद्ध झालेले असून विद्रोह हा त्यांच्या एकुणच कवितेचा स्थायिभाव आहे.

कवी आणि कविता हे नातं, नातं नसतंच ते एकमेकांत भिणून गेलेल्या देहात प्राण ओतणाऱ्या एकजीव नसा असतात. म्हणून तर कवितेवर कविता न लिहिणारा तिच्याशी हितगूज न करणारा कवी शोधूनही सापडणार नाही! संजय घाडगे यांच्या कविता पहा :

अक्षरांचा गाव शब्द माझा देव
काळजाचा ठाव अहोरात्र

बाळाच्या गालावरील
तीट असते कविता
विठोबाच्या पायाखालची
वीट असते कविता

चिमण्यांनी माणसांसाठी आजही
ती गायलेली गाणी आठवतात
आणि आता फक्त चिमण्या ह्या
कवीच्या काळजातच फडफडतात


ज्यांचे श्वास व्याकूळ होतात
त्यांच्या लेखणीचे भाले होतात!

समाजकारण आणि राजकारण हा
संजय घाडगे यांचा जिव्हाळ्याचा
विषय आहे. राजकारण हे कधीच
सरळ मार्गाने जात नाही. विनोद
आणि गांभीर्य दोन्ही बाबी
इथे आनंदाने नांदतात.
कवीने राजकारणाची उडवलेली
खिल्ली वाचकांना गुदगुल्या करते.

अडानी माझी माय बोलू लागली की,

भल्याभल्यांची टरकते
माय दुरडीला ग्रामपंचायत
काटवटीला विधानसभा
अन् तव्याला लोकसभा म्हणते

प्रस्तावनेत प्रा. डॉ. अनंत राऊत म्हणतात, 'अस्वस्थ वर्तमानाचा बर्म्युडा ट्रँगल' या संग्रहामधील कविता ही विद्रोही वणवा आणि कारुण्याने ओथंबलेली, हळव्या शब्दांची




घनव्याकूळ काव्यसंपदा अस्वस्थ वर्तमानाचा दंभस्फोट करते. कवी संजय घाडगे यांची कविता काव्यलेखन क्षेत्रात लक्षणीय आहे. त्यांची तळस्तरकेंद्री जीवनदृष्टी मी महत्त्वाची मानतो.' या कवितेचे हे अगदी योग्य विश्लेषण आहे. कवी रोखठोकपणे राजकारणांवर भाष्य करताना म्हणतात :

आज कोणी कोणासाठी
इथे आसवे ढाळत नाही
करतात राजकारण
माणसे शहिदांच्याही मरणावर

राजकारणी भाषणांत लोकशाहीचा
उदो उदो करताना दिसतात, पण
व्यवहारात मात्र अगदी उलट वागतात,
हे चित्र आता लपून राहिलेले नाही.

लोकशाहीला गाडून
ठोकशाही जन्माला येईल
आणि पुन्हा गुलामांचं
राज्य, गुलामांचा प्रदेश
एक गुलामांचा राजा शिरावर असेल

राजकारणाचा संदर्भ आईशी
जोडला की त्याला भावनिक
पातळीवर नेणे सहजसाध्य होते.
संजय घाडगे यांनी हे दाखवून दिले आहे.

उघड्या डोळ्यांनी

भडकलेल्या ज्वाला पाहताना हंबरडा फोडून रडत असते माय उर बडवून ... लोकशाहीच्या नावानं तिचा आक्रोश विरून जातो आसमंतात

जातीधर्मांच्या नावावर लोकांना चिथावणी देऊन राज्य काबिज करता येते, हे राजकारणी जाणून आहेत. म्हणूनच 'देश तसा वेश' या पातळीवर ते वर्तन करीत असतात. पण जनता देखील आता भोळी राहिलेली नाही. त्यांना माहीत आहे की,

ते संविधानाच्या नावे जयघोष करतात
निळ्या झेंड्याला सलाम ठोकतात
कधी कधी ... दिखाव्यासाठी !
राजकारणाचा भाग म्हणून
जयभीमही ठोकतात!

कवी संजय घाडगे संग्रहाच्या आत्मकथनात म्हणतात,'अराजकता रस्तोरस्ती, गल्लोगल्ली माजली आहे आणि बर्म्युडा ट्रँगल आ वासून उभा आहे. तिथे कुणालाही दया, क्षमा, शांती किंवा करुणेची याचना चालत नाही. हा खवळलेला काळा समुद्र किती आणि कुणाकुणाला गिळंकृत करणार आहे?' तथापि, हे अधिक काळ चालणार नाही, याची प्रचिती कवी देतात ती अशी :

साहेब आता जित्या माणसांच्या
ओल्या जखमांचे ऑडिट करत
आहेत
एवढ्यात फुटक्या
चष्म्यातून आजी म्हणाली,
साहेब!
चुलीतला अंगारबी
लिवा, त्यो अजून बाकी हाय
त्यो अजून इझला नाय
... त्यो अजून जिता हाय!

माणूस आज चंद्रावर गेला अन् माणूसपण विसरला हे सांगताना कवी म्हणतात, आता चंद्रावर जाऊनही माणसाने विष पेरू नये, जातीपातीची अहंकारी वस्ती किमान तिथे तरी बांधू नये. आपली संस्कृती विविधतेने नटलेली आहे. परंपरेने आलेल्या जशा श्रद्धा आहेत, तशा अंधश्रद्धाही! अशा संस्कृतीला उद्धेशून कवी म्हणतात :

ह्या मातीतून ... राखेतून
जीवंत सहिसलामत आलीस
भेटलीस!
थांब!
तुझ्या भाळावर मी बुद्धाच्या
करूणेची गाथा लिहितोय!

कारण कवीला माहीत आहे की, सर्वधर्म समभाव सहिष्णूतेची शिकवण आहे आणि या मातीमध्ये समतेची ममतेची रुजवण आहे. भरून उरावा छातीत आनंद आणि असावा माणसाला छंद माणसाचा. खरेतर, हा लाभलेला देह चिरस्थायी नाही. किमान जाताना -

एकही शल्य उरी दाटू नये
आणि विचारावा प्रश्न स्वतःला
जाताना सोबत काय घेऊन जाणार
आहेस?

म्हणून माणसांच्या वाटा वाकड्या असल्या तरी चालणे आपले सरळ असावे आणि वाटेत काटे असले तरी ध्येय मात्र अढळ असावे. इथं शहरात आपलातुपला कोणीच कोणाचा नसतो, खरं तर माणूस आयुष्यभर धडपडत अन् धावत असतो. म्हणून आपण सर्वजण मिळून मिसळून जगायचे, कवी म्हणतात :

चला,
इथे पुन्हा मानवतेचे बंध
समतेच्या धाग्याने बांधू या
विश्व एकात्मता मनामनात रुजवू या
प्रत्येकाच्या ओठी अहिंसेची गाणी
पेरू या!

मलपृष्ठावरील मजकूरात प्रा.डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर म्हणतात, 'वर्तमानावर केवळ भाष्य करून ही कविता थांबत नाही तर भविष्याच्या निर्माणाचा सुंदर मूल्यआलेख यातून आकाराला आला आहे. मराठी कवितेत हे चिंतनशील परखड भाष्य रसिक वाचक गांभीर्यपूर्वक स्वीकारतील. तेव्हा ही कविता मराठी कवितेत अत्यंत महत्त्वाची कविता म्हणून कवितेच्या इतिहासात नोंद घेणे अटळ आहे.' या मजकूराशी सहमत होताना मी म्हणेल की, संजय घाडगे केवळ कविता लिहीत नाहीत तर ते कविता जगतात. त्यांच्या जगण्यातून कविता वजा करताच येणार नाही. जे अवतीभवती घडते ते संवेदनशील मनाला खूप यातना देणारे आहे. याच यातनांचे प्रतिबिंब म्हणजे या कविता होत. या कवितासंग्रहाला चित्रकार भ.मा. परसवाळे यांचे सुंदर मुखपृष्ठ लाभले आहे. आपण सर्वांनी हा संग्रह जरूर वाचावा.

**अस्वस्थ वर्तमानाचा बर्म्युला ट्रँगल**
**कवी संजय घाडगे**
**शब्दगाथा प्रकाशन,**
**विकासनगर, लातूर.**
**पृष्ठे १२०, किंमत २५०**

---------------

**तुकाराम पुंडलिक खिल्लारे,**
**५७, 'पार्वती निवास ',**
**गणपती मंदिराच्या बाजूला,**
**लोकमान्यनगर,**
**परभणी - ४३१ ४०१**
**भ्रमणध्वनी : ८८३०५९९६७५**
ईमेल : tukaram.
khillare57gmail.com

# अखेर १९ दिवसांच्या ऐतिहासिक शिक्षक लढ्याला यश!

## ३१ मार्च २०२७ पासून वाढीव टप्पा अनुदान; शिक्षणमंत्री दादा भुसे यांची घोषणा

### ➤ अंशतः अनुदानित शिक्षकांच्या आझाद मैदानावरील संघर्षाला मिळाले यश; ➤ आ. रोहित पवार यांच्यामुळे टप्पा वाढीचा प्रश्न शासनासमोर अधिक ठळक, निर्णय प्रक्रियेला मिळाली गती





**मुंबई/प्रतिनिधी** : सलग १९ दिवस मुसळधार पाऊस, गैरसोयी आणि प्रचंड संघर्ष सहन करत आझाद मैदानावर आंदोलन करणाऱ्या अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या ऐतिहासिक आंदोलनाला अखेर यश मिळाले. राज्य सरकारने पात्र अंशतः अनुदानित शाळांना ३१ मार्च २०२७ पासून वाढीव टप्पा अनुदान लागू करण्यात येईल अशी घोषणा शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आझाद मैदानावर आंदोलनकर्त्या शिक्षकांसमोर करताच संपूर्ण मैदानात जल्लोष उसळला. आंदोलन कर् शिक्षकांनी एकमेकांचे अभिनंदन करत आपल्या संघर्षाच्या विजयाचा आनंद साजरा केला.

यावेळी शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्यासोबत जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आ. ज्ञानेश्र्वर म्हात्रे आणि आ. मंगेश चव्हाण यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून शासनाचा निर्णय जाहीर केला. यावेळी वाढीव टप्प्याची अनुदानाची रक्कम पात्र शिक्षकांच्या खात्यात जमा करण्यात येईल, असेही स्पष्ट केले.

राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना पुढील वाढीव टप्पा अनुदान मिळावे, या प्रमुख मागणीसाठी २२ जूनपासून मुंबईतील आझाद मैदानावर शिक्षकांचे आंदोलन सुरू होते. या आंदोलनात राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो शिक्षक सहभागी झाले होते. प्रतिकूल हवामान, राहण्याच्या अडचणी आणि अनेक गैरसोयी असूनही शिक्षकांनी शिस्तबद्ध, संयमी आणि निर्धार पूर्ण पद्धतीने सलग १९ दिवस आंदोलन सुरू ठेवले. शासनाकडून सकारात्मक घोषणा होताच आझाद मैदानावर विजयाचा उत्साह संचारला.

या आंदोलनादरम्यान विविध पक्षांतील अनेक लोकप्रतिनिधींनी आंदोलनस्थळी भेट देऊन शिक्षकांना पाठिंबा दिला. त्यामध्ये आ. रोहित पवार यांनी घेतलेली भूमिका विशेष चर्चे चा विषय ठरली. शिक्षकांच्या न्याय्य मागणीसाठी ते आझाद मैदानावर रात्री उशिरापर्यंत ठामपणे उभे राहिले.

शिक्षका सोबत रात्रभर आंदोलनस्थळी थांबण्याची तयारीही त्यांनी दर्शविली होती. मात्र, पोलिस प्रशासनाने लागू असलेल्या नियमांची माहिती दिल्यानंतर आंदोलनात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, या भूमिकेतून त्यांनी आंदोलनस्थळ सोडले.

दरम्यान आ. रोहित पवार यांनी घेतलेल्या आक्रमक आणि ठाम भूमिकेमुळे वाढीव टप्पा अनुदानाचा प्रश्र्न शासनासमोर अधिक ठळकपणे मांडला गेला आणि निर्णय प्रक्रियेला गती मिळाली. त्याचबरोबर सत्ताधारी पक्षातील काही आमदारांनी शिक्षक आणि शासन यांच्यात समन्वय साधण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे अधिवेशनाच्या अखेरच्या टप्प्यात चर्चांना वेग आला आणि अखेर शासनाने शिक्षकांच्या प्रमुख मागणीवर सकारात्मक निर्णय जाहीर केला.

वाढीव टप्पा अनुदानाची घोषणा होताच आझाद मैदानावर उपस्थित हजारो शिक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि घोषणाबाजी करत विजयाचा जल्लोष साजरा केला.

अनेक दिवसांच्या संघर्षानंतर मिळालेल्या या निर्णयामुळे राज्यभरातील अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. आता शासनाने जाहीर केलेल्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून वाढीव टप्पा अनुदानाची रक्कम वेळेत पात्र शिक्षकांच्या खात्यात जमा करावी, अशी अपेक्षा आंदोलनात सहभागी शिक्षकांनी व्यक्त केली.

## पंढरपूरच्या आषाढी वारीतील ७ वारकऱ्यांना ट्रकने उडवले, जेजुरीजवळ ३ महिला भाविकांचा मृत्यू, ४ जखमी

**पुणे/प्रतिनिधी** आषाढी एकादशीच्या निमित्ताने विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने पंढरपूरकडे निघालेल्या वारकऱ्यांवर आज सकाळी मोठा अनर्थ ओढावला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यासोबत पायी चालत निघालेल्या वारकऱ्यांना जेजुरी परिसरातील भोंगळे मळा येथे एका भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात तीन महिला वारकऱ्यांचा मृत्यू झाला असून, चार वारकरी गंभीर जखमी झाले आहेत.

सध्या राज्यभरातून लाखो वारकरी ऊन-पावसाची तमा न बाळगता पायी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होत आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी सासवडचा मुक्काम आटोपून आज जेजुरीच्या दिशेने मार्गस्थ झाली होती. सकाळच्या वेळी अनेक वारकरी जेजुरीच्या दिशेने पायी चालत निघाले होते. या मार्गावर सुरक्षेच्या कारणास्तव एकाच बाजूने वाहने सोडली जात होती. प्राथमिक माहितीनुसार, जेजुरी नजीकच्या भोंगळे मळा परिसरात मागून आलेल्या एका भरधाव ट्रकने वारकऱ्यांच्या टेम्पोला आणि पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की यात तब्बल सहा वारकरी चिरडले गेल

अपघात घडताच परिसरातील नागरिक आणि इतर वारकऱ्यांनी तात्काळ मदतकार्य सुरू केले. जखमी झालेल्या सर्व सहा वारकऱ्यांना तातडीने नजीकच्या स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान यापैकी तीन महिला वारकऱ्यांचा उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तर उर्वरित तीन जखमी वारकऱ्यांवर सध्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्यांचीही प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

अपघाताबद्दल महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. या दुर्घटनेत तीन महिला वारकऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून काही वारकरी गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

## निकृष्ट रस्ते, अवैध उत्खननाविरोधात विभागीय आयुक्त कार्यालयासमोर धरणे; मागण्या न मानल्यास १५ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा इशारा




**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : लातूर-बाभळगाव-निटूर-निलंगा-औराद शहाजनी या सुमारे ७० किलोमीटर लांबीच्या काँक्रिट रस्त्याच्या कथित निकृष्ट दर्जाच्या बांधकामाची उच्चस्तरीय चौकशी तसेच लातूर जिल्ह्यातील भिंगोली येथील कथित अवैध मुरूम उत्खनन प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते विवेक माधवराव साळुंके व प्रा. शिवाजी महादेव एडके यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी (दि. १३) विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे दिवसभर शांततापूर्ण धरणे आंदोलन करण्यात आले.

सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत झालेल्या आंदोलनाद्वारे शासनाचे लक्ष दोन गंभीर जनहिताच्या प्रश्र्नांकडे वेधण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी आरोप केला की, लातूर-बाभळगाव-निटूर-निलंगा-औराद शहाजनी या काँक्रिट रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठ्या भेगा पडल्या असून काँक्रिट उखडणे, रस्ता खचणे आणि इतर तांत्रिक दोष निर्माण झाले आहेत. त्यामुळे वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्र्न निर्माण झाला असून अपघातांचे प्रमाणही वाढल्याचा दावा करण्यात आला.

या प्रकरणाची स्वतंत्र तृतीय-पक्ष गुणवत्ता तपासणी करून दोषी कंत्राटदार, अभियंते व संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी व विभागीय कारवाई करावी, तसेच रस्त्याची दर्जेदार पुनर्बांधणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय मौजे भिंगोली (ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर) येथील गायरान जमिनीवर कथित अवैध मुरूम उत्खनन, वृक्षतोड, तलावाच्या सांडव्याची तोडफोड आणि शासनाच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि शासनाचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करावे, अशी मागणी करण्यात आली.

प्रशासनाने निवेदनावर तातडीने समाधानकारक कार्यवाही न केल्यास २० जुलै रोजी सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री यांच्या दालनासमोर आंदोलन करण्यात येईल. त्यानंतरही मागण्या प्रलंबित राहिल्यास १५ ऑगस्ट २०२६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे आवश्यक कायदेशीर परवानग्यांच्या अधीन राहून बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.

या वेळी आंदोलनकर्ते विवेकभैय्या माधवराव साळुंके, प्रा शिवाजी महादेव एडके, यांच्या समवेत कमलाकर शिंदे, लालासाहेब पाटील, मोहन बनसोडे, आयुष पाटील, राजेश वाघमारे, विठ्ठल श्रीमंगले संघर्ष कांबळे उपस्थित होते

## ह.भ.प.मधुकर महाराज इनामदार यांची परमार्थातुन देशहितासाठी समाजसेवा!

### पुनरिक्षण कार्यक्रमासाठी हरीकिर्तनातुन मतदारांची केली जागृती!; अधिकाऱ्यांना सहकार्य करण्याचे कीर्तनातून केले आवाहन



**केज/प्रतिनिधी** :२०२६ च्या भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुनरिक्षण कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला असून २३४ बीएलओ हे १ महिन्यात घरोघरी जाऊन पडताळणी करत आहेत. यामध्ये केज तालुक्यातील २ लाख १० हजार ९५६ मतदाराची माहिती यावेळी अद्यावत करायची आहे.

केज येथे एस.आय.आर कार्यक्रमांतर्गत मतदार याद्या पुनरिक्षण व अद्यावतीकरण कार्यक्रम उपविभागीय अधिकारी आंबेजोगाई, दिपक वजाळे, यांच्या हस्ते केज शहरातून सुरुवात केली आहे. हा कार्यक्रम प्रत्येक गावात प्रत्येक घरापर्यंत शाळेचे शिक्षक पोलीस पाटील व इतर कर्मचारी या कामासाठी रात्रंदिवस काम करत आहेत. परंतु पाहिजे तसा प्रतिसाद जनतेतून मिळत नसल्याने त्यांनी खंत व्यक्त केली. काल दि.१२ जुलै २०२६ रविवार रोजी येवता येथे पदमीनबाई सोनवणे यांच्या वर्ष श्रद्धा निमित्त ह. भ. प. मधुकर महाराज इनामदार हरिकिर्तन आयोजित करण्यात आले होते.

परमार्थ करत ह.भ.प. इनामदार महाराज यांनी देशहिताला महत्त्व दिले. सद्या सुरू असलेला राष्ट्रीय कार्यक्रम अर्थात एस.आय. आर. कार्यक्रमांतर्गत मतदार यादी पुनरिक्षण व अद्यावतीकरण या कार्यक्रमाला सर्वांनी सहकार्य करावे.तसेच त्यांनी सांगितले यावेळी जनतेला आवाहन केले की एस.आय.आर. कार्यक्रमांतर्गत मतदार यादी पुननिरीक्षण व अध्यावतीकरण कार्यक्रमासाठी आपल्या घरी येणाऱ्या किंवा आपल्याकडे येणाऱ्या अधिकाऱ्यांना वरील कामासाठी सहकार्य करून आपले नाव नोंदणी करून घ्यावे.

हा राष्ट्रीय कार्यक्रम असुन यात आपले आणि देशाचे हित आहे.तसेच यावेळी ह.भ.प. मधुकर महाराज इनामदार यांनी पदमीनबाई सोनवणे यांच्या वर्षश्रद्धा निमित्त ठेवलेल्या या हरिकिर्तनातुन जमलेल्या श्रोत्यांना सांगितले की या जिवनात सर्वांनी आपल्या आई वडिलांना सांभाळा अशी विनंती केली. आई वडील हेच सर्वस्व आहेत. आणि आई-वडिलांची सेवा केल्याने काहीच कमी पडत नाही. याचे ज्वलंत उदाहरण आज आपण पाहत आहोत.असे या किर्तनावेळी त्यांनी केले.

## सोने, चांदीचे दर घसरले

**मुंबई/प्रतिनिधी :** आज सोने तसेच चांदी घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी आनंदाची बातमी आहे. जळगाव शहरातील सुवर्ण बाजारपेठेत आज सोने आणि चांदीचे दर घसरले आहेत. मागील आठवड्याच्या अखेरीस सोने, चांदीच्या दरात वाढ झाली होती. त्यामुळे ग्राहकांच्या खिशाला कात्री लागणार होती. मात्र, नवीन आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सोमवारी दोन्ही धातूंचे दर घसरल्याने ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सोने, चांदीचे भाव ठरण्यासाठी जागतिक बाजारपातळीवरील घडामोडी महत्त्वपूर्ण ठरतात. सध्या अमेरिका-इराणमधील वाढत्या तणावामुळे जागतिक आर्थिक बाजारपेठांमध्ये पुन्हा अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले असून, त्याचा परिणाम कच्च्या तेलासह इतर मौल्यवान धातूंच्या किमतींवरही दिसून येत आहे. या घडामोडींमुळे गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीचे पर्याय शोधत आहे आहे. त्यामुळे गुंतवणूकदार सोने आणि चांदीच्या किमतींवर विशेष लक्ष केंद्रित करत आहे. त्याम ुळे आंतरराष्ट्रीय बाजारात विक्रीचा दबाव कायम राहिल्याने दोन्ही धातूंच्या दरांमध्ये घसरण नोंदवण्यात आली.

कॉमेक्सवरील व्यवहारांमध्येही सोन्याच्या किमती सुमारे १.१२ टक्क्यांनी म्हणजेच ४६.२० डॉलरने घसरून प्रति औंस ४,०६७.५० डॉलर इतक्या झाल्या. त्याचप्रमाणे चांदीच्या किमतींमध्येही २.६४ टक्क्यांची घसरण झाली असून, त्या प्रति औंस ५८.५७५ डॉलर या पातळीवर आल्या आहेत. तज्ज्ञांच्या मते, मौल्यवान धातूंमधील अलीकडील घसरण ही नफा वसूली, डॉलरमधील चढ-उतार आणि जागतिक बाजारातील अनिश्चिततेमुळे झाली असली, तरी दीर्घकालीन दृष्टीने मौल्यवान धातूंना सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून मागणी कायम राहण्याची शक्यता आहे.

## लव्हुरीच्या श्री.बडेबाबा विद्यामंदिर शाळेचा घोळ मिटेना!

### ➤ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवित्व अंधारात ! ; पालक,ग्रामस्थ बीड जिल्हा परिषदेत विद्यार्थ्यांची शाळा भरविण्याच्या पावित्र्यात!
### ➤ संस्थापक अध्यक्ष व सचिव यांनी वरिष्ठांच्या आदेशाला दाखवली केराची टोपली-पालकांचा आरोप




**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील लव्हुरी येथील श्री. बडेबाबा विद्यामंदिर या शाळेचा घोळ काही मिटायचे नाव घेत नसून यामुळे विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक होत आहे. शाळेच्या या कारभारामुळे मात्र विद्यार्थ्यांचे भवित्व अंधारात दिसत आहे. तर संस्थापक अध्यक्ष व सचिव हे रिक्त झालेल्या जागेवर शिक्षकांची नेमणूक करून घेत नसल्यामुळे पालक व ग्रामस्थांनी शाळेला टाळे ठोकून आंदोलन सुरू केले आहे.

परंतु प्रशासनाने व शाळेचे मुख्याध्यापक आणि संस्थापक अध्यक्ष व सचिव आणि शाळेचे मुख्याध्यापक यांनी अद्यापही आंदोलनाची दखल न घेतल्यामुळे बुधवार रोजी बीड जिल्हा परिषद मध्ये ग्रामस्थ व पालक हे विद्यार्थ्यांची शाळा भरवणार असल्याच्या इशारा प्रशासनाला प्रसार माध्यमांशी बोलताना पालक व ग्रामस्थांनी दिला आहे. शिक्षणाधिकारी यांनी श्री.बडेबाबा विद्यामंदिर या शाळेतील शिक्षकांच्या रिक्त झालेल्या जागेवर शिक्षकांची नियुक्ती केली आहे. व त्या शिक्षकांना श्री. बडेबाबा विद्या मंदिर येथे नियुक्त करण्याचे आदेश संस्थापक अध्यक्ष/ सचिव यांना दिले असताना देखील संस्थापक अध्यक्ष व सचिव यांनी वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली असल्याचा आरोप पालक व ग्रामस्थांनी केला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दि. १६ /६/२०२५ रोजी पासून कार्यकारी अधिकारी, शिक्षण अधिकारी माध्यमिक विभाग बीड यांना पालक व ग्रामस्थ यांनी तेव्हापासून ते आज रोजी पर्यंत आम्ही वेळोवेळी संबंधित वरिष्ठ अधिकारी यांना १५ ते १६ वेळा पत्र दिले आहेत. व दिनांक १०नोव्हेंबर २०२५ रोजी सरपंच, पालक, ग्रामस्थ यांनी पाच दिवस शाळेसमोर आमरण उपोषण केले त्यावेळी शिक्षण अधिकारी माध्यमिक विभाग जि. प. बीड यांनी दिनांक१४ नोव्हेंबर २०२५ रोजी शिक्षकांच्या भरती करण्याचे लेखी आश्र्वासन दिल्याने आम्ही उपोषण स्थगित केले. व आमच्या मागण्याप्रमाणे शिक्षक देण्यात आले.

परंतु सदरील शाळेत या शिक्षकांना नियुक्त केले करून घेतले नाही. संस्थाचालक व शाळेचे मुख्याध्यापक यांच्या आडमुठ्या भूमिकेमुळे व मनमानी कारभारामुळे अशा बेजबाबदार संस्थाचालक व मुख्याध्यापक यांच्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. दिनांक १५/६/ २०२६ पासून शाळा सुरू झाल्या परंतु इयत्ता नववी व दहावी या वर्गाला गणित विषयाला शिक्षकच नसल्याने गणित विषयाची एकही तासिका झालेली नाही.

याबाबत विद्यार्थ्यांनी व पालकांनी व गावचे सरपंच यांनी तक्रार केली असता सरपंच व पालक ग्रामस्थ यांनी मुख्याध्यापक यांच्यामार्फत संस्थेचे सचिव श्रीमती मंगलबाई संपतराव खांडेकर यांच्या सोबत दिनांक ८/ ७ /२०२६ रोजी श्री.बडेबाबा विद्यामंदिर या शाळेत बैठक घेण्यात आली होती.

या बैठकीमध्ये सरपंच व पालक ग्रामस्थ यांनी सदर शाळेत रिक्त झालेल्या शिक्षकांची पदे भरण्याबाबत विनंती केली असता संस्थाचालक संस्थापक सचिव यांनी रिक्त झालेल्या शिक्षकांच्या जागा भरण्याबाबत स्पष्ट नकार दिला. व शाळा आहे त्या स्थितीमध्ये चालणार तुम्हाला आमच्या शाळेत विद्यार्थी ठेवायचे असतील तर ठेवा अन्यथा तुमच्या विद्यार्थ्यांचे टिसी घेऊन जा असे बेजबाबदारपणे सांगितले यावरून असे स्पष्ट होते की, संस्थापक सचिव या बेजबाबदारपणे वागत आहेत. त्यांना विद्यार्थी यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीचे गांभीर्य नाही.

त्यामुळे पालक ग्रामस्थ यांनी एकत्र येऊन दिनांक ०९/०७/२०२६ रोजी पासून जोपर्यंत रिक्त झालेल्या शिक्षकांच्या जागा भरण्यात येत नाहीत. तोपर्यंत शाळेला टाळेबंद आंदोलन सुरू राहील. या भूमिकेवर ग्रामस्थ ठाम आहेत. व यापुढे जर आमच्या प्रश्र्नांची दखल घेतली नाही. तर आम्ही जिल्हा परिषद बीड या ठिकाणी शाळा भरवणार असल्याचे पालकांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले आहे.

# महाडीबीटी पोर्टलवर तूर मिनीकीटसाठी अर्ज प्रक्रिया सुरु; लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सन २०२६-२७ अंतर्गत खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना प्रमाणित तूर मिनीकीटचे (बियाणे संच) वाटप करण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यासाठी प्राप्त एकूण ७ हजार मिनीकीटच्या भौतिक लक्षांकापैकी आजतागायत ३ हजार ८३५ मिनीकीटचे वितरण यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. उर्वरित ३ हजार १६५ तूर मिनीकीटसाठी अद्याप पुरेसे अर्ज प्राप्त न झाल्यामुळे त्यांचे वितरण प्रलंबित राहिले आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी तातडीने ऑनलाइन अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी केले आहे.

या अभियानांतर्गत बियाणे संच वितरण करण्याची ही प्रक्रिया पूर्णपणे महाडीबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येत आहे, लाभार्थ्यांची निवड प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर केली जाणार आहे आणि यासाठी १० एप्रिल २०२६ पासूनच महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा खुली करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना अर्ज करणे सोपे जावे, यासाठी कृषी विभागाने मार्गदर्शक टप्पे जाहीर केले असून, इच्छुकांनी सर्वप्रथम mahadbt.maharashtra.gov.in/Farmer या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन लॉगिन करावे, त्यानंतर अर्ज सादर करणे या पर्यायावर क्लिक करून मुख्य घटकांमधील बियाणे वितरण, प्रात्याक्षिक, फ्लेक्झी घटक, औषधे आणि खते हा पर्याय निवडावा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या उप-घटकांमधून बियाणे संच - तूर मिनीकीट हा पर्याय निवडून आपला अर्ज सादर करावा, जेणेकरून शिल्लक राहिलेल्या बियाणेसंचाचा लाभ घेऊन शेतकऱ्यांना आपले उत्पादन वाढवता येईल.

# मिनी ट्रॅक्टर पुरवठा योजनेसाठी १७ ऑगस्ट पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या ८ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने पुरवण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन स्तरावरून निश्चित करण्यात आल्या असून, हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नागरिकांच्या निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. लातूर जिल्ह्यातील इच्छुक आणि पात्र बचत गटांकडून सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र बचत गटांनी आपले अर्ज पूर्ण भरून येत्या १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर या कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन लातूर समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

# खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांनी घेतली पालकमंत्र्यांची भेट, लातूर जिल्ह्याच्या तीन महत्त्वाच्या प्रश्नांकडे वेधले लक्ष



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. शिवाजीराव बंडप्पा काळगे यांनी शनिवार, दि.११ जुलै २०२६ रोजी उशिरा रात्री लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची लातूर येथील शासकीय विश्राम गृहात भेट घेऊन लातूर जिल्ह्याशी निगडित तीन अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी संबंधित विषयांबाबत स्वतंत्र निवेदने पालकमंत्र्यांना सादर केली.

खा. डॉ. काळगे यांनी लातूर शहरातील वाढती वीज मागणी लक्षात घेता शहरात नवीन विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीची योग्य जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस उपलब्ध करून देण्याची मागणी केली. नवीन उपकेंद्र उभारल्यास लातूर शहरातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम होऊन नागरिकांना अखंडित वीजपुरवठा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तसेच, चालू खरीप हंगामात लातूर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकासाठी वापरलेल्या बियाण्यांची उगवण अत्यल्प झाल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाल्याने निकृष्ट अथवा बोगस बियाण्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार मदत व नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणीही त्यांनी पालकमंत्र्यांकडे केली.

याचबरोबर, लातूर जिल्ह्यात विविध भागांमध्ये पिकांवर शंखी गोगलगायींचा वाढता प्रादुर्भाव झाल्यामुळे कोवळ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे निदर्शनास आणून देत कृषी विभागामार्फत तातडीने क्षेत्रीय पाहणी, शास्त्रशुद्ध नियंत्रण उपाययोजना, आवश्यक औषधांचा पुरवठा, जनजागृती आणि शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची मागणीही खा. डॉ. काळगे यांनी केली. सदर विषयांची दखल घेत पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधून आवश्यक ती तातडीची कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

जिल्ह्याच्या विकासाशी आणि शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित या विषयांवर प्रशासनाने प्राधान्याने कार्यवाही करून लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा खा. डॉ. काळगे यांनी पालकमंत्र्यांच्या भेटीनंतर व्यक्त केली आहे.

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणा विरोधात निलंग्यात एल्गार..

## ३० जुलैं निलंग्याच्या महामोर्चासाठी जोरदार रणशिंग..

**निलंगा/प्रतिनिधी :** अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाविरोधात अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, निलंगा यांच्या वतीने शासकीय विश्रामगृह, निलंगा येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत उपवर्गीकरणाच्या प्रस्तावावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली तसेच ३० जुलै रोजी निलंगा येथे होणारा तालुकास्तरीय महामोर्चा अभूतपूर्व करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बैठकीत उपस्थित विविध समाजघटकांच्या प्रतिनिधींनी अनुसूचित जातींच्या घटनात्मक अधिकारांवर कोणताही आघात सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींच्या एकात्मतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत, संविधानाने दिलेल्या सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना धक्का पोहोचेल, अशी भूमिका मांडण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने उपवर्गीकरणाचा निर्णय तत्काळ रद्द करून राज्यात सामाजिक सलोखा अबाधित ठेवावे या आंबेडकर वादी जनतेच्या भावनेकडे दुर्लक्ष केले तर सरकारला दूरगामी परिणाम भोगावे लागतील यासाठी समस्त आंबेडकरी जनता या विचारांच्या विरोधात रस्त्यावर येऊन तीव्र स्वरूपात आंदोलन करुन राज्य सरकारला सळो की,पळो केल्याशिवास स्वस्त बसणार नाहीत दोन्ही समाजात जातीय तेढ निर्माण करून राज्य सरकार काय साध्य करणार असा सूरही या बैठकीत काढण्यात आला. याबाबत राज्यसरकार मार्फत वर्गीकरणाबाबत झालेला संभ्रम दूर करावा.या प्रमुख मागणीसाठी निलंगा येथील.समस्त आंबेडकरवादी पक्ष, संघटना, संस्था तसेच निलंगा येथील चांभार,मातंग,ढोर,मुस्लीम., धनगर,ओबीसी समाजातील प्रतिनिधी उपस्थित राहून मोर्चास पाठिंबा दिला. मोर्चाच्या तयारीसाठी तालुक्यात जाहीर बैठकीचे आयोजन करण्याचे आवाहनही करण्यात आले.




बैठकीत निलंगा शहर व तालुक्यातील प्रत्येक गावातून मोठ्या संख्येने मोर्चास महिला, युवक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी निलंग्याच्या महामोर्चात सहभागी व्हावे, यासाठी व्यापक जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक भागातून वाहनांची व्यवस्था करून हजारोंच्या संख्येने नागरिकांना मोर्चात सहभागी करण्यासाठी नियोजन आखण्यात आले.

उपस्थितांनी संविधान, सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेच्या मूल्यांच्या संरक्षणासाठी लोकशाही व संविधानिक मार्गाने संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला. शासनाने समाजात मतभेद निर्माण करणाऱ्या निर्णयांऐवजी विश्र्वास, संवाद आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणारी भूमिका स्वीकारावी, अशी अपेक्षाही बैठकीत व्यक्त करण्यात आली.

सदर बैठकीच्या अध्यक्षस्थानी विलास सूर्यवंशी हे होते यावेळी रजनीकांत कांबळे,अंकुश ढेरे, प्रा. रोहित बनसोडे, धम्मानंद काळे,दाजीबा कांबळे, अर्जुनाप्पा कटके (ढोर समाज), देविदास धैर्य ,खाटिक समाजाच्या वतीने डॉ. प्रमोद हातागळे, मातंग समाजाच्या वतीने सतीश कांबळे,उल्हास वाघमोडे,चर्मकार समाजाच्या वतीने काशिनाथ जाधव,सुभाष भालके,रणवीर भालके, विजय जाधव,धनगर समाजाच्या वतीने झटिंग (अण्णा) म्हेत्रे,मुस्लिम समाजाच्या वतीने शेख सिराज,हज्जू सय्यद, यांच्यासह, नागोराव गायकवाड (दाजी) विजयकुमार सूर्यवंशी,प्रकाश गायकवाड, सूर्यकांत कांबळे, अंगद गवळी, प्रकाश कांबळे, दाजीबा कांबळे,दिगंबर सूर्यवंशी, देवदत्त सूर्यवंशी, अनंत कांबळे, बंटी कांबळे, शुभम सूर्यवंशी मोहन, सुभाष कांबळे, मोहन वाघमारे, तानाजी सुरवसे, प्रदीप सोनकांबळे, मुन्ना सुरवसे, रोहन सुरवसे,गौतम कांबळे, संदीप कांबळे, लहू ढेरे, प्रविण कांबळे,धनराज कांबळे,संजय हत्तरगे, धनराज कांबळे,यांच्यासह विविध समाजघटकांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय क्रीडा पुरस्कारांसाठी 30 सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**मुंबई /प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या अधिपत्याखालील जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई उपनगर कार्यालयामार्फत २०२५-२६ या वर्षासाठी जिल्हास्तरीय क्रीडा पुरस्कारांसाठी ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सायली जाधव यांनी केले आहे. जिल्ह्यातील गुणवंत क्रीडापटू आणि क्रीडा मार्गदर्शक यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारासाठी अर्जदाराचे महाराष्ट्रात संबंधित जिल्ह्यात सलग १५ वर्षे वास्तव्य असणे, वय ३५ वर्षे पूर्ण असणे आणि किमान १० वर्षे क्रीडा मार्गदर्शक म्हणून कार्य केलेले असणे आवश्यक आहे. तसेच गेल्या दहा वर्षांत राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पदक विजेते खेळाडू घडविलेल्या मार्गदर्शक यांसाठी पात्र असतील.

खेळाडू पुरस्कारासाठी अर्जदाराने पुरस्कार वर्षासह मागील पाच वर्षांपैकी किमान दोन वर्षे संबंधित जिल्ह्याचे मान्यताप्राप्त स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व केलेले असावे. राज्य, राष्ट्रीय, शालेय आणि केंद्र शासनामार्फत आयोजित स्पर्धांमधील मागील पाच वर्षांतील कामगिरीपैकी सर्वोत्तम तीन वर्षांच्या कामगिरीचा विचार पुरस्कारासाठी केला जाणार आहे.

इच्छुकांनी विहित नमुन्यातील अर्ज ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत, सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालय परिसर, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१ येथे सादर करावेत. अधिक माहितीसाठी ०२२-२०८९०७१७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सायली जाधव यांनी केले आहे.

# एस.आय.आर. अभियानात प्रत्येक पात्र मतदारांचा सहभाग महत्त्वाचा

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एस.आय.आर.) अभियानाच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १५ चे नगरसेवक प्रवीण कस्तुरे व पुनीत पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात सर्व बीएलओ, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख व भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. मतदार यादी अद्ययावत करण्याच्या या महत्त्वपूर्ण अभियानात कोणताही पात्र नागरिक वंचित राहू नये, यासाठी नियोजनबद्ध जनजागृती करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

बैठकीत एस.आय.आर. अभियानाची उद्दिष्टे, मतदार नोंदणीची प्रक्रिया, नावातील दुरुस्ती, पत्ता बदल, नवमतदारांची नोंदणी, मृत व स्थलांतरित मतदारांची माहिती अद्ययावत करणे, आवश्यक कागदपत्रे तसेच बूथनिहाय नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक बीएलओ व बूथ प्रमुखाने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घराशी संपर्क साधून नागरिकांना मतदार यादी पुनरीक्षणाबाबत जागृत करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी एस.आय.आर. अभियानाच्या व्यापक जनजागृतीसाठी सज्ज करण्यात आलेल्या जनजागरण रथाचे उद्घाटन जिल्हा अध्यक्ष मा. अजित पाटील कव्हेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हा रथ प्रभागातील सर्व भागांमध्ये फिरून नागरिकांना मतदार यादी पुनरीक्षणाचे महत्त्व, आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया आणि नागरिकांनी घ्यावयाची काळजी याबाबत माहिती देणार आहे. या माध्यमातून प्रत्येक पात्र मतदारापर्यंत पोहोचून मतदार यादी अधिक अचूक व परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

यावेळी नगरसेवक प्रवीण कस्तुरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "लोकशाहीची खरी ताकद मतदारामध्ये आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. एस.आय.आर. अभियान हे केवळ प्रशासकीय काम नसून लोकशाही अधिक सक्षम करण्याचे अभियान आहे. प्रत्येक बीएलओ, बूथ प्रमुख आणि कार्यकर्त्याने नागरिकांपर्यंत जाऊन त्यांना या प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे.

नगरसेवक पुनीत पाटील यांनीही प्रभागातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करून एस.आय.आर. अभियान शंभर टक्के यशस्वी करण्याचे आवाहन केले. प्रत्येक बूथवर प्रभावी जनसंपर्क, घरभेटी आणि जनजागृतीच्या माध्यमातून मतदार नोंदणीचे काम वेगाने पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमास नगरसेवक ॲड. प्रदीप मोरे, भारतीय जनता पार्टीचे महामंत्री संजय गिर, मंडळाचे पालक तुकाराम गोरे, मंडळाध्यक्ष रोहित पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रभागातील प्रतिष्ठित नागरिक, बीएलओ, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने मतदार उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी उपस्थित सर्वांनी एस.आय.आर. अभियान यशस्वी करण्यासाठी प्रत्येक घरापर्यंत पोहोचण्याचा संकल्प व्यक्त केला. आगामी काळात जनजागरण रथाच्या माध्यमातून संपूर्ण प्रभागात व्यापक जनसंपर्क मोहीम राबवून प्रत्येक पात्र नागरिकाची मतदार नोंदणी व आवश्यक दुरुस्ती करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# दिव्यांग बांधवांच्या अडचणी प्राधान्याने सोडवा - जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांच्या विविध समस्या व अडचणींचे प्राधान्याने निवारण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सर्व शासकीय यंत्रणांना दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतीच दिव्यांग बांधवांच्या विविध समस्यांबाबत विशेष आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीस जिल्ह्यातील विविध दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी आणि संबंधित शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीला अतिरिक्त जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी तथा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते राजू गायकवाड, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे समन्वयक बसवराज पैके, विशेष शिक्षक व्यंकट लामजने यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




या बैठकीत दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार आता प्रत्येक सोमवारी ग्राम आणि तालुका पातळीवर दिव्यांगांसाठी विशेष आरोग्य शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. तसेच जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र आणि अलिमको मार्फत दिव्यांग बांधवांचे मोजमाप घेऊन त्यांना आवश्यक कृत्रिम अवयव पुरविले जातील. या प्रक्रियेला गती देण्यासाठी यु.डी.आय.डी. संगणक ऑपरेटर यांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार असून, सत्यापन ॲप नोंदणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत सर्व ग्रामसेवकांना आवश्यक निर्देश दिले जाणार आहेत. यासोबतच जिल्ह्यातील सर्व दिव्यांगांचे आधार कार्ड अपडेट करण्याचे काम वेगाने पूर्ण केले जाईल आणि त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्राधान्याने मिळवून दिला जाईल. तसेच जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांमार्फत पात्र दिव्यांग बांधवांचा अंत्योदय अन्न योजनेत समावेश करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी लातूर जिल्ह्यातील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांची अचूक नोंदणी करण्यासाठी आणि त्यांना आवश्यक असणाऱ्या साहित्याची मागणी नोंदवण्यासाठी गुगल फॉर्म वर नोंदणी करण्याचे निर्देश दिले, तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत दिव्यांगांना वाहतूक परवाना मिळण्यात अडचणी येऊ नयेत, यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करून परवाना देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# डी. एम. ज्युनिअर कॉलेजमध्ये अकरावीचे स्वागत, पालक मेळावा व गुणवंतांचा गौरव

**लातूर/प्रतिनिधी :** नवीन जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील अवंती नगर येथील डी. एम. ज्युनिअर कॉलेज, लातूर येथे अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत शासनाच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेद्वारे दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत, पालक मेळावा तसेच JEE व MHT-CET परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव मा. कालिदासजी माने यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज माने, विलासराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विवेक माने, साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक इस्माईल शेख, पालक प्रतिनिधी ढोक, पोटे, श्रीमती शिंदे यांच्यासह पालक, विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी गएए परीक्षेत ९९.८२ पर्सेंटाइल मिळवून आयआयटी दिल्ली येथे निवड झालेल्या घुले अद्वैत अरुण तसेच ९९.४२ पर्सेंटाइल मिळवून आयआयटी हैदराबाद येथे निवड झालेल्या बावा चाणक्य राहुल यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच MHT-CET (PCB) मध्ये चव्हाण मेघराज (९८.९०%) व जमादार प्रणाली (७९.२२%), तसेच MHT-CET (PCM) मध्ये घुले अद्वैत (९९.८०%), बावा चाणक्य (९८.८०%), भोगावकर चिन्मय (९८.६४%), पोटे जान्हवी (९५.००%), जवंडरे अनोज (९३.८८%), शर्मा सारा (९३.३६%), कुलकर्णी ऋतुराज (९२.५६%), स्वामी स्वप्नील (९१.८९%), शेख सायमा (८७.४४%), गाडे वैष्णवी (८६.२१%), शिंदे समर्थ (८५.५२%), टेकाळे गौरहरी (८५.४७%), बोरकर ज्ञानेश्र्वर (८५.२१%), शिंदे प्रणव (८२.६२%), अग्रोया राज (८१.८५%), दिवटे पूनम (८१.६१%) आणि राठोड जगदीश (८०.७९%) या गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य एस. एस. चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. वैशाली भोसले तर आभार इयत्ता १२ वी कला शाखेतील खपरले पार्वती यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. ए. डी. सूर्यवंशी, व्ही. एस. थोरात, एस. व्ही. कांबळे, बी. एस. बुरशे, व्ही. ए. भोसले, बी. के. माळी, एस. बी. बोधणे, एस. ए. शेख, एस. बी. माने, पी. सी. बामणकर, ए. ए. लखादिवे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी डी. के. पवार, डी. जे. जाधव, दिग्विजय पांचाळ, आर. पी. सुडे आणि ए. एस. हेडे यांनी परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.